महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १९० वे | दिनांक : ०४/०७/२०२६ | वार : शनिवार

## केस दाखल केली म्हणजे तुम्ही निर्दोष ठरत नाही: चाकणकरांच्या नोटिशीवर रूपाली ठोंबरेंचा पलटवार





**मुंबई :** नाशिकच्या वादग्रस्त भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणावरून राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रूपाली चाकणकर यांनी दिल्ली हायकोर्टात अब्रू नुकसानीचा दावा दाखल करत विरोधकांना नोटिसा पाठवल्याची घोषणा केल्यानंतर, आता यावर त्यांच्याच पक्षातील नेत्या रूपाली ठोंबरे-पाटील यांनी अत्यंत आक्रमक आणि सडेतोड पवित्रा घेतला आहे. "कोर्टात केस दाखल केली म्हणजे तुम्ही निर्दोष ठरत नाही, जनतेची दिशाभूल करणे बंद करा," अशा शब्दांत ठोंबरे यांनी चाकणकर यांना थेट आव्हान दिले आहे.

रूपाली चाकणकर यांनी पत्रकार परिषद घेऊन आशा मिरगे, रूपाली ठोंबरे, सुषमा अंधारे आणि अंजली दमानिया यांना कोर्टाच्या नोटिसा गेल्याचे सांगितले होते. यावर बोलताना रूपाली ठोंबरे म्हणाल्या, "चाकणकर बाई, तुम्हाला कायद्याने अधिकार दिलाय, त्यामुळे तुम्ही कोणतीही याचिका दाखल करू शकता. तुम्ही दिल्ली कोर्टात जी याचिका दाखल केली आहे, त्याची नोटीस आम्हाला मिळाली असून आम्ही ती सन्मानाने स्वीकारली देखील आहे. याबाबतची पोस्ट मी 24 जून रोजीच माझ्या अधिकृत सोशल मीडिया पेजवर टाकली होती, ती कोणीही पाहू शकते."

भोंदूबाबा खरात प्रकरण महाराष्ट्रात घडले असून वृत्तवाहिन्यांचे कार्यक्षेत्रही महाराष्ट्र (पुणे/मुंबई) आहे, असे असताना हे प्रकरण जाणीवपूर्वक दिल्ली कोर्टात नेण्यावर रूपाली ठोंबरे यांनी तीव्र आक्षेप घेतला. "भोंदू बाबा खरातचे संपूर्ण प्रकरण आणि वृत्तवाहिन्यांचे कार्यक्षेत्र हे महाराष्ट्रातील आहे. तरीही चाकणकर यांनी जाणीवपूर्वक ही याचिका दिल्लीत दाखल केली आहे. तुम्हाला महाराष्ट्रातही याचिका दाखल करता आली असती, परंतु हा तुमचा कायदेशीर 'लपाछपीचा डाव' आहे. केवळ दहशत निर्माण करण्यासाठी आणि कायदेशीर चौकटीत न बसणारी ही याचिका तुम्ही दिल्लीत का दाखल केली, हे मी येणाऱ्या काळात समोर आणेन," असा इशारा ठोंबरे यांनी दिला.

रूपाली ठोंबरे यांनी स्वतः वकील असल्याचा दाखला देत रूपाली चाकणकर यांना 10 जुलैच्या सुनावणीसाठी जाहीर आव्हान दिले. "मी स्वतः वकील असल्यामुळे या केसच्या सुनावणीसाठी दिल्ली कोर्टात स्वतः हजर राहणार आहे. पोलिसांच्या तपासातून ज्या गोष्टी समोर आल्या, त्यावरच आम्ही बोललो आहोत."

"तुम्ही आम्हाला अमेरिकेतून डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून जरी नोटीस पाठवली असती, तरी आम्ही तिथे कायदेशीर लढा लढायला आलो असतो. ही कायदेशीर लढाई आम्ही पूर्ण ताकदीने लढणार आणि जिंकणारच. काळजी करू नका, 10 जुलैला कोर्टात भेटूच! तुम्ही तरी नक्की या!" असा टोला रूपाली ठोंबरे यांनी लगावला.

शेवटी, रूपाली चाकणकर यांच्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळावर टीका करताना ठोंबरे म्हणाल्या की, "ज्या व्यक्तीला कायदा समजत नाही, अशा व्यक्तीला महिला आयोगाच्या अध्यक्षपदावर बसवून महाराष्ट्राचे आणि संपूर्ण महिला वर्गाचे फार मोठे नुकसान झाले आहे. कोर्टात दूध का दूध आणि पाणी का पाणी होईल," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## तुकाराम मुंढेंचा मोर्चा आता दूध सम्राटांकडे : 'फार्म टू प्लेट' कडक नियमावली लागू



**मुंबई :** राज्याचे अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या धडक कारवाईचे सत्र सुरूच असून, हॉटेल, बेकरी आणि पनीर विक्रेत्यांनंतर आता त्यांनी आपला मोर्चा राज्यातील 'दूध सम्राटांकडे' वळवला आहे. दुग्धजन्य पदार्थांमधील वाढती भेसळ आणि ग्राहकांच्या आरोग्याशी होणारा खेळ थांबवण्यासाठी मुंढे यांनी राज्यात 'सेव्ह फूड, सेव्ह ड्रग' ही विशेष मोहीम हाती घेतली आहे. या अंतर्गत दूध संकलनापासून ते थेट ग्राहकांच्या ताटात जाईपर्यंतच्या संपूर्ण पुरवठा साखळीसाठी अत्यंत कडक नियमावली जाहीर करण्यात आली आहे.

मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत आयुक्त तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केले की, दुधातील भेसळ आणि कृत्रिम दुधाचा सुळसुळाट रोखण्यासाठी संपूर्ण 'इकोसिस्टम' बदलणे गरजेचे आहे. त्यानुसार जारी करण्यात आलेले नवे आदेश हे 'दूध संकलन केंद्रे आणि दूध शीतकरण केंद्रे, दूध प्रक्रिया आणि पॅकेजिंग करणारे उद्योग, किरकोळ विक्रेते आणि बल्क (घाऊक) दूध विक्रेते, पनीर, खवा, लोणी, क्रीम, चीज आणि आईस्क्रीमचे उत्पादन व विक्री करणारे व्यावसायिक' यांना बंधनकारक असतील.

हॉटेल आणि रेस्टॉरंट्सवर केलेल्या कारवाईचा दाखला देत आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दूध व्यवसायिकांना कडक इशारा दिला आहे. हॉटेल तपासणीदरम्यान अनेकांनी 'पेस्ट कंट्रोल' केल्याची केवळ खोटी प्रमाणपत्रे दाखवली होती, मात्र प्रत्यक्षात तिथे कोणतेही काम झाले नव्हते. अशा लबाडी करणाऱ्या हॉटेल्सचे परवाने एफडीएने तात्काळ रद्द केले आहेत.

"मला केवळ कागदावरचे नियम आणि प्रमाणपत्रे नको आहेत. जर दुग्ध व्यवसायाच्या ठिकाणी प्रत्यक्ष नियमांचे पालन झाले नाही, तर कोणतीही पूर्वसूचना न देता थेट व्यावसायिक लायसन्स (परवाना) रद्द केले जाईल," असा इशारा तुकाराम मुंढे यांनी दिला आहे.

"आदेशाचा उद्देश केवळ भेसळ रोखणे नसून सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण वाढ करणे, प्रामाणिक दुध व्यवसायांना प्रोत्साहन देणे आणि राज्यात आधुनिक अन्न सुरक्षा संस्कृती विकसित करणे हा आहे. राज्यभर करण्यात आलेल्या तपासण्या, निरीक्षण, नमुना विश्लेषणे अंमलबजावणी कारवाईतून दूध पुरवठा साखळीच्या विविध टप्यावर काही गंभीर त्रुटी सातत्याने निदर्शनास आल्या. या त्रुटी केवळ जिल्ह्यापूत्या नाही संपूर्ण पुरवठा साखळीमध्ये एकसमान अनुपालन व्यवस्था आवश्यक आहे," असेही मुंढेंनी म्हटले.

राज्यभरात केलेल्या तपासणीत अन्न साखळीमध्ये प्रशासनाला खालील धक्कादायक प्रकार आढळून आले आहेत:

- दुधामध्ये पाण्याची भेसळ करणे.
- रसायनांचा वापर करून कृत्रिम दूध तयार करणे आणि विकणे.
- दुधात युरिया, डिटर्जेंट, कॉस्टिक सोडा, स्टार्च, ग्लुकोज आणि मेलामाईन यांसारख्या मानवी आरोग्यास घातक रसायनांचा वापर.
- मिल्क फॅट आणि एसएनएफ मानकांचे सर्रास उल्लंघन.
- दूध साठवणूक आणि वाहतुकीदरम्यान शीतसाखळीचे पालन न करणे.
- विनापरवाना किंवा प्रशासनाकडे नोंदणी न करता व्यवसाय चालवणे.
- उत्पादनांवर चुकीचे लेबलिंग करून ग्राहकांची दिशाभूल करणे.

दरम्यान, पत्रकारांच्या स्टिंगबाबतच्या प्रश्नावर उत्तर देताना तुकाराम मुंढे म्हणाले, " बाजारात जे काही सोल कॉल्ड एनर्जी डिंक्स म्हणून येतात, या सो कॉल्ड एनर्जी ड्रिंक्सच्या कंपन्यांना एनर्जी ड्रिंक्स हा शब्द लिहता येत नाही, ३० जून रोजी याबाबत त्यांना नोटीस काढण्यात आल्या आहेत. १०-१२ कंपन्या आहेत, पेप्सिको, रेड बुल, स्टिंगसारख्या कंपन्या ज्या कंपन्या आहेत, त्यांना फिसच्या नियमावलीनुसार संबंधित कंपन्यांना तो शब्द लिहता येत नाही. त्यामुळे, संबंधित कंपन्यांना एनर्जी ड्रिंक असे आपल्या उत्पादनावर लिहता येणार नाही, हे नोटीसमध्ये बजावले आहे. त्यामुळे, आता ते बंद होईल, असे तुकाराम मुंढे यांनी सांगितले.

"शाळा परिसरात, ५०० मीटर परिसरात कुठल्या पदार्थांना, शीतपेयांना विक्री आहे, याचे नियम आहेत. आता, या नियमांची अंलबजावणी करण्याची जबाबदारी एफडीए आयुक्त म्हणून माझी आहे. तसेच, दुसरीकडे शाळेतील मुख्याध्यापकांचीही आहे, आपल्या शाळा परिसरात ५०० मीटरच्या आत जर अशा प्रकारचे ड्रिंक्स विकले जात असेल तर आमच्या विभागाला कळवावे, लवकरच याबाबत मी सविस्तर आदेश पारीत करत आहे," असेही तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केले.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०४ जुलै २०२६


## आडगाव बाजार येथील महिलेचा मृतदेह दोडगाव शिवारात आढळला



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** तालुक्यातील आडगाव बाजार येथे ३० जून मंगळवार रोजी सायंकाळच्या पाच वाजेच्या सुमारास तुफान झालेल्या पावसात मंगलाबाई शेषराव खंडागळे ही शेतकरी महिला पेरणी करण्यासाठी शेतात गेली असता घराकडे परत येताना गावाशेजारील ओढ्यालातुफान झालेल्या पावसाने पूर आल्याने त्यांना पाण्याचा अंदाज न आल्याने त्यामुळे वाहून गेल्याची घटना घडली रात्री उशिरापर्यंत गावातील ग्रामस्थांच्या वतीने शोध कार्य सुरू होते मात्र रात्री उशिरापर्यंत त्या आढळून आल्याने रात्री उशिरा शोध कार्य थांबविण्यात आले दुसऱ्या दिवशी सकाळी गावातील ग्रामस्थांच्या वतीने ए एन डी आर एफ पथकातील जवानांच्या मदतीने शोध कार्य सुरू होते दुसऱ्या दिवशी दुपारी एक वाजेच्या सुमारास औंढा तालुक्यातील दोडगाव शिवारात पुरात वाहून गेलेल्या मंगलाबाई शेषराव खंडागळे या महिलेचा मृतदेह आढळून आला

## महाडीबीटी पूर्वसंमतीच्या अडचणीत छ. संभाजीनगरचा बळीराजा; विजय म्हस्के पाटील यांचे कृषिमंत्र्यांना साकडे

**छत्रपती संभाजीनगर :** मृग नक्षत्र सरून पेरण्यांची लगबग अंतिम टप्प्यात आली असतानाच,छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील लाखो शेतकरी महाडीबीटी (MahaDBT) पोर्टलवरील पूर्वसंमती अभावी शासकीय चक्रव्यूहात अडकले आहेत. या गंभीर समस्येकडे केंद्रीय ग्राहक संरक्षण समितीचे जिल्हाध्यक्ष विजय म्हस्के पाटील यांनी थेट राज्याचे कृषि मंत्री मा.ना.दत्तात्रय (दत्ता मामा) भरणे यांना ईमेलद्वारे निवेदन पाठवून तातडीने लक्ष वेधले आहे.विजय म्हस्के पाटील यांनी निवेदनात म्हटले आहे की,एकीकडे शेतकरी पावसाची वाट पाहत असताना,दुसरीकडे हक्काच्या अनुदानाची पूर्वसंमती अद्यापही 'कुलूपबंद' आहे.पेरणीची मुख्य वेळ निघून गेल्यावर या मंजुरीचा शेतकऱ्यांना काय उपयोग? हा विषय तांत्रिक नसून शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहाशी निगडित आहे. सध्या राज्याचे पावसाळी अधिवेशन सुरू असल्याने कृषि मंत्र्यांनी स्वतः यात लक्ष घालून ही प्रशासकीय कोंडी फोडावी आणि जिल्ह्यातील शेतकऱ्यांना त्वरित पूर्वसंमती मिळवून द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.बळीराजाला आता मंत्र्यांच्या सकारात्मक निर्णयाची प्रतीक्षा आहे.

## माळीवाडा येथे शेतकरी मार्गदर्शन



**दौलताबाद (जावेद अहमद) :** मौजे माळीवाडा या ठिकाणी वसंतराव नाईक कृषी सप्ताह निमित्त शेतकरी मार्गदर्शन 03जुलै रोजी आयोजित करण्यात आले.डॉ. बसवराज पिसूरे. कृषी विज्ञान केंद्र यांनी खरीप पीक व्यवस्थापन कापूस तूर मूग उडीद सोयाबीन पिकाबाबत लागवड ते काढणी पर्यंत सखोल असे मार्गदर्शन केले. प्रामुख्याने तणनाशकांचा वापर, हुमणी आळी नियंत्रण प्रकाश सापळे, चिकट सापळे, खत व्यवस्थापन रोग किड व्यवस्थापन याबाबत शेतकऱ्यांच्या प्रश्नांना उत्तर देत मार्गदर्शन केले. तालुका कृषी अधिकारी श्री मेघश्याम गुळवे यांनी महाराष्ट्र शासन कृषी विभाग योजना बाबत माहिती देऊन शेतकऱ्यांना अंजीर पीक विमा भरणे बाबत आव्हान केले. जिल्हा कृषी विकास अधिकारी श्री प्रकाश पाटील यांनी, भारतामध्ये छत्रपती संभाजीनगर आणि कोल्हापूर या दोन जिल्ह्यांमध्ये पायलेट प्रोजेक्ट म्हणून ऑनलाइन खतांच्या बुकिंग बाबत शेतकऱ्यांना माहिती देऊन आपणाला कोणत्याही प्रकारचे खत हे आपल्या स्वतःच्या मोबाईल वरून बुक करता येईल.त्यामुळे कोणत्याही लिंकिंग होणार नाही आणि आपलं विनाकारण होणारा खर्च हा 100% टाळता येईल हे शेतकऱ्यांना समजावून सांगितले.तसेच खत तपासणी अधिकारी दिनकर जाधव यांनी शेतकऱ्यांना ऑनलाइन खत बुकिंग मोबाईल मध्ये वापराबाबत माहिती दिलीकार्यक्रमाचे सूत्रसंचालन रंगनाथ पिसाळ सहाय्यक कृषी अधिकारी यांनी केले.

यावेळी कार्यक्रमाला चंद्रकांत हेकडे, कडूभाऊ कीर्तीकर, संतोष थोरात, भगवान शेळके, धोंडीराम जगधने, जनार्धन बनकर, सुरेंद्र जगधने, एकनाथ शिरसाठ, एकनाथ शिरसाठ वसत साठे प्रकाश आढाव , वैजिनाथ मुळे,गणेश आस्वार, संदीप मुळे, प्रशांत जगधने उपस्थित होते. नंदकिशोर मुळे यांनी आभार मानले.

## अभ्यासक्रमात कौतुकाची थाप, सत्कर्म हेच मायबाप



**छत्रपती संभाजीनगर :** तालुका व जिल्हा संभाजीनगर येथील डेक्कन मिलीटरी स्कुलमध्ये तिसरी व चौथीच्या शिक्षकांच्या प्रशिक्षणात प्रसिद्ध साहित्यिक अय्युब पठाण यांनी प्राशिक्षणार्थींना " लेखक आपल्या भेटीला " या उपक्रमात मार्गदर्शन करतांना सांगितले की, " मुलांना नवीन अभ्यासक्रमातील पाठ आणि कवितांचा तिसरी- चौथीच्या विद्यार्थी यांना प्रभावीपणे अध्यापन करावे. त्यातून चांगले विद्यार्थी घडवावे आणि विविध टायलंट परीक्षेत विद्यार्थी हे यशस्वी होतील, चौथीच्या अभ्यासक्रमात कौतुकाची थाप, सत्कर्म हेच मायबाप." लेखक अय्युब पठाण यांची चौथीच्या नवीन अभ्यासक्रमात " कौतुकाची थाप " हा पाठाचा मराठी भाषाच्या अभ्यासक्रमात समावेश आहे. प्रारंभी तज्ञ प्रशिक्षक नितीन पवार यांनी लेखक पठाण यांचा स्वागत व सत्कार केला. याप्रसंगी छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील शाळेमधील तिसरी आणि चौथीला अध्यापन करणारे सर्व शिक्षक- शिक्षिका हे मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता अय्युब पठाण यांच्या " आई " या मधूर आणि ऱ्हदयस्पर्शी कविता गायनाने झाली.


**१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी**

**D.M.L.T**

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

**मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.**

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०४ जुलै २०२६


## अपघातानंतर आर्थिक संकटात; मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी ठरला आधार १०० वर्षीय वृद्धेला अवघ्या २४ तासांत आर्थिक सहाय्य मंजूर




**मुंबई (भगवंत पाळवदे) :** गंभीर अपघातामुळे उपचारासाठी आर्थिक अडचणीत सापडलेल्या १०० वर्षीय सरूबाई मुंजवार यांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून अवघ्या २४ तासांत आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात आले. या सहाय्यामुळे त्यांच्यावर आवश्यक शस्त्रक्रिया वेळेत पार पडून पुढील उपचार तातडीने सुरू करणे शक्य झाले. सरूबाई मुंजवार या रस्ता ओलांडत असताना भरधाव दुचाकीच्या धडकेत गंभीर जखमी झाल्या. या अपघातात त्यांच्या डाव्या मांडीला गंभीर दुखापत झाली. त्यानंतर त्यांना फलटण येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. वैद्यकीय तपासणीनंतर डॉक्टरांनी तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला. उपचारासाठी सुमारे सव्वा लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असल्याने त्यांच्या कुटुंबासमोर आर्थिक अडचण निर्माण झाली.

नातेवाईकांच्या माध्यमातून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी योजनेची माहिती मिळाल्यानंतर रुग्णालयाच्या सहकार्याने २५ जून रोजी आर्थिक सहाय्यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीकडे अर्ज सादर करण्यात आला. अर्ज प्राप्त होताच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाने आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून प्रकरणावर तातडीने कार्यवाही केली. अवघ्या २४ तासांत आर्थिक सहाय्यास मंजुरी देण्यात आली. त्यामुळे उपचारात कोणताही विलंब न होता आवश्यक वैद्यकीय सेवा वेळेत उपलब्ध होऊ शकली. या आर्थिक मदतीबद्दल सरूबाई मुंजवार यांच्या कुटुंबीयांनी समाधान व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षामार्फत गरजू रुग्णांना उपचारासाठी आवश्यक आर्थिक सहाय्य कमीत कमी कालावधीत उपलब्ध करून देण्यास प्राधान्य दिले जात आहे. सरूबाई मुंजवार यांच्या प्रकरणात अर्ज प्राप्त होताच आवश्यक पडताळणी व कार्यवाही पूर्ण करून अवघ्या २४ तासांत आर्थिक सहाय्यास मंजुरी देण्यात आली. आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यास मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून अल्पावधीत आर्थिक सहाय्य मंजूर करण्याची कार्यपद्धती अवलंबिली जाते. गरजू रुग्णांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत अधिक माहिती अथवा मार्गदर्शनासाठी टोल फ्री क्रमांक १८०० १२३ २२११ वर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे

## मुरूममध्ये रोटरी क्लबकडून डॉक्टरांचा कृतज्ञतापूर्वक सत्कार



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** आरोग्यसेवेला समर्पित असलेल्या डॉक्टरांच्या निस्वार्थ कार्याचा गौरव करण्यासाठी 'राष्ट्रीय डॉक्टर दिना'चे औचित्य साधून रोटरी क्लब मुरूम सिटीच्या वतीने डॉ. जिरोळे हॉस्पिटलच्या सभागृहात बुधवारी (ता. १) रोजी आयोजित शहरातील विविध डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरीचे नूतन अध्यक्ष कलय्या स्वामी होते. यावेळी व्यासपीठावर रोटरीचे माजी अध्यक्ष प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी, महात्मा बसवेश्वर पतसंस्थेचे अध्यक्ष शिवशरण वरनाळे, डॉ. नितीन डागा, डॉ. शिवप्रसाद काबरा, सचिव कलाप्पा पाटील, प्रकाश रोडगे आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी धन्वंतरी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. राजेंद्र पाटील, डॉ. महेश स्वामी, डॉ. महेश जिरोळे, डॉ. वर्षा बिराजदार, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. शिल्पा डागा, डॉ. शिल्पा जिरोळे, डॉ. प्रीती चिलोबा, डॉ. सागर काबरा, डॉ. अनिश डागा, डॉ. वैभव कोरे यांचा शाल, फेटा आणि पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.अध्यक्षीय समारोपप्रसंगी कलय्या स्वामी म्हणाले की, डॉक्टरांची सेवा ही रुग्णांसाठी वरदान असते. समाजातील प्रत्येक घटकाने त्यांच्या या कष्टप्रद कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे गरजेचे आहे. दरम्यान, शिवशरण वरनाळे, डॉ. नितीन डागा, डॉ. वर्षा बिराजदार, डॉ. शिवप्रसाद काबरा, डॉ. महेश जिरोळे, डॉ. प्रीती चिलोबा, डॉ. सुवर्णा पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. महेश मोटे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी तर सचिव प्रकाश रोडगे यांनी उपस्थितांचे आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रोटरीचे माजी अध्यक्ष गोविंद पाटील, प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले, प्रा. राजकुमार वाकडे, बाबासाहेब पाटील, प्रा. भूषण पाताळे, संतोष कांबळे, शिवकुमार स्वामी आदींनी पुढाकार घेतला. फोटो ओळ : मुरूम, ता. उमरगा येथील जिरोळे हॉस्पिटलच्या सभागृहात रोटरी क्लबच्या वतीने डॉक्टर डॉक्टर्स डे च्या निमित्ताने शहरातील डॉक्टरांचा सत्कार प्रसंगी मान्यवर व अन्य.

## “पडक्या शाळा अन् शहरातून आलेले सूट-बुटातील गुरुजी; शिक्षण व्यवस्थेचं वास्तव पुन्हा चर्चेत”




**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** आज जिल्हा परिषद शाळा उघडल्या, पडक्या जीर्ण झालेल्या शाळेसमोर नव्या कोऱ्या गाडीमधून सुटा बुटातून शहरातून आलेल्या गुरुजींकडे पाहत होतो.*50वर्षांपूर्वी जिल्हा परिषदेची शाळा व गुरुजी दोघेही दरिद्री होते.900 रुपये पगार असल्यामुळे गुरुजी गावातच राहत होते. याच कौलाच्या शाळेत गावात राहणाऱ्या गुरुजी ने या देशाला मोठमोठी हिरे दिले! बापा पेक्षा गुरुजीचा दरारा घरात आणि गावात जास्त होता. देवापेक्षा गुरुजीला थोडा जास्तच सन्मान होता हळूहळू गुरुजीच दारिद्र संपलं! गुरुजी शहरात राहायला गेले व नोकरीसाठी गावात अपडाऊन करू लागले,पण शाळेचा दारिद्र तसंच राहिलं! १७००० शाळा बंद पडल्या म्हणजे ३४ हजार भावी शिक्षक घरीच बसले.रिटायर झालेले शिक्षक शिकवणारे शिक्षक याच्यावर व्यक्त सुद्धा होत नाही.जिल्हा परिषदेच्या १७००० शाळेचा प्लॅन मर्डर झाला खाजगी शाळा जगवण्यासाठी त्याच पाप कसे फेडणार..?आज जीर्ण झालेल्या शाळेला फुगे लावून गुलाब पुष्प देऊन मुलांची रॅली काढून जिल्हा परिषद च्या शाळेला ऍडमिशन घ्या असा उपक्रम घ्यावा लागतो, दारिद्र्यात असलेला बाप खर्च झेपत नसताना तो खाजगी शाळेत पाठवतो त्याला वाटते माझं दारिद्र माझ्या पोराच्या नशिबात येऊ नये पण त्याचा खाजगी शाळा खिसा कापत असताना या शिक्षण पॉकेट माराला तुम्ही मदत केली म्हणून आज अशी अवस्था आली, सध्याच्या तुमच्या पगारातला एक टक्का तरी हिस्सा तुमच्या शाळेवर खर्च करा सरकारची वाट पाहू नका! गावातून वर्गणी गोळा करा! आहे ती शाळा वाचवा कारण तुमची गाडी घर याच्यावर चालते. आहे त्या शाळा आणि ते गुरुजी उरलेल्या शाळा जरी वाचू शकले तरी भरपूर आहे. रिटायर झालेल्या शिक्षक घरी बसून पेपर वाचत बसण्यापेक्षा रोज आपल्या जवळच्या शाळेत थोडा वेळ द्या किमान गरीबाच्या पोरासाठी आहे त्या शाळा वाचू शकतील.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903

**महाराष्ट्र जनशक्ती**

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०४ जुलै २०२६

# नदी समजून घेतांना....

जेंव्हा केव्हा मी प्रचंड अस्वस्थ असतो,
कशातच मन लागत नाही तेव्हा,
माझे पाय तगट निघतात नदीच्या दिशेने.

नदी माझ्या काळीज कुपीत दडून बसली,
ईतकी की त्यातून आता विलग होणे शक्य नाही.

नदी असतो निसर्ग अनुभवण्याचा एक अखंड प्रवास,
लोकसंस्कृतीच्या पाऊलखुणा शोधण्याचा एक टप्पा.

नदी असतो आपल्या अस्तित्वाचा,
आणि जाणिवेचा ही एक बोध.

नदी केवळ जीवनवाहिनी नाही तर,
ती आहे आपल्या जीवंतपणाचा पुरावा.
नदीशिवाय नसतेच आपले जीवन - मरण.

म्हणूनच ज्याच्या गावाला नदी असते,
तो धन्य समजायचा...

त्याने नदी पाहिलेलीच नसते तर अनुभवलेली असते.
नदी केवळ पहायची नसते,
ती प्रत्यक्ष जगायचीही असते.

उंटावरून शेळ्या हाकून नदी
समजून घेता येत नसते.
त्यासाठी धार आणि काठ
पायाघालून घालावा लागतो.

नदी समजून घेणे अवघड आहे,
तरीही आपण जमेल तशी, जमेल तेव्हा
नदी समजून घेतलीच पाहिजे...

**- डॉ. शिवाजी हुसे**

## पावसाचे थेंब

टप टप पडती
पावसाचे थेंब
मातीतून उगवती
कोवळे कोंब

ढगातून बरसती
अमृत धारा
मनमुराद सुटे
गंधीत वारा

नदी अन् नाले
खळखळ वाहती
समृद्धीचे गीत
पक्षी गाती


चिंब चिंब भिजे
लता अन् वेली
व्याकुळलेली धरती
झाली छान ओली




**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.9011559106**




# भेगाळल्या जमिनीतल्या ओल्याचिंब कवितांचा काव्यसंग्रह "शेतशिवार "





प्राध्यापक आनंदा डावरे यांचा "शेतशिवार "काव्यसंग्रह शेतकरी जीवन संघर्षाचा मूला धार आहे, प्राध्यापक आनंदा डावरे हे खेडेगावात बहरलेले संवेदन मनाचे कवी आहेत, त्यांचा संपूर्ण जीवन प्रवास विविध सामाजिक जीवनभान ठेवून संकटांना तोंड देत एक आदर्शवत व्यक्तिमत्व म्हणून स्थिरावले, उच्च शिक्षण घेऊन त्यांनी पत्रकारिता साहित्यात आपला वेगळा ठसा उमटविला आहे , तीन दशकं आंतरभारतीचे संपादक तसेच लेखक कवी म्हणून परिचित आहेत, त्यांची वैविध्यपूर्ण साहित्य संपदा लक्षात घेण्यासारखी आहे, त्याकाळी पोस्ट नसलेल्या निंब्रळ खेड्यातून आलेल्या आनंदा डावरे यांचा प्राध्यापक म्हणून उल्लेख सार्थ ठरतो तो त्यांच्या चढत्या आलेखी कर्तुत्वाने; माय मातीचा तसेच मानव जाती प्रतिमातीचा सहवास तसेच अखिल सजीव सृष्टीच्या निर्मितीसाठी मातीचे ऋण व्यक्त करण्यासाठी हा काव्यसंग्रह समर्पित आहे "शेतशिवार " हे शीर्षक मुळातच ग्रामीण जीवन उन्नतीत असलेले शेतीवाडी चे उचित अनन्यसाधारण महत्व दूगोचर करते, कवीच्या गावावर नैसर्गिक स्त्रोतांची मुक्तहस्ते उधळण केली आहे , प्रवरा नदीच्या विळख्यात ते एक छोटे बेट आहे, धरण होण्यापूर्वीचा व नंतरचा संघर्षमयी व्यथित केलेला काळ प्राध्यापक आनंदा डावरे यांनी प्रस्तुत काव्यसंग्रहात प्रामाणिकपणे मांडला आहे , पाणी आणि धरणाचं नातं अनोखं असतं सभोवताली बागडणारे पक्षी, गुंजारव करणारे किटक यांचा काव्याअनुभव हा संग्रह आणून देतो, "शेत शिवारात माझ्या "या काव्यसंग्रहातील पहिल्याच कवितेत याची प्रचिती येते, "शेतशिवारात माझ्या संगीत रातकिड्यांचे जाते आभाळ पेरून रात पुनवेत झुलते "अशी नवनवीन निसर्ग सौंदर्य कवीला लिहिण्यास प्रवृत्त करीत असते; कवी आनंदा डावरे हे निसर्ग कवी रानकवी असल्याची साक्ष काही रान कविता वाचून पटते, नाधों महानोर यांच्या जात कुळीतील शेत शिवारात रमणारे हे कवी आहेत , "गुलमोहर , किमया,"हळद उन्हाची ", डोंगर,"सोन पिवळ्या उन्हात"झुळूक,"हळद नवरी"या रानातल्या कविता जंगलात घेऊन जातात व सौंदर्य प्रतिभेने शब्द गंधित होऊन मनात रुंजी घालीत असतात , कविता मधील प्रतीके ,प्रतिमा ,उपमा , शब्दगेयता वनराजीचे गुणगान करीत असतात ,नैमितिक जीवनाची बोली वाचताना वाचक मनोहारी आनंद अनुभवतो, दुसराच काव्यसंग्रह असूनही काव्यप्रतिभेची व सर्जनशीलतेची ग्वाही देतो एवढे मात्र निश्चित ,"सांज पांघरून घेते धरती जेव्हा जराशी गप्प गुमान पाखरेहीझाडे घेती उराशी अवघे चराचर पहुडलेजेव्हा या शिवारी तेव्हा रानवाराही विसावतो या शिवारी "हे रान वाऱ्याचे विसावणे अप्रतिम काव्य प्रतिभेतूनच येऊ शकते ,रानवारा धरतीच्या कुशीत शांत होतो ही शब्द कळा मनाला भुरळ घालते लक्ष पाखरांचे थवे पाहणारी सर्वच माणसे विलोभनीय दृश्य कवेत घेत नाहीत."वैदीण "कवितेत कवीची सूक्ष्म निरीक्षण वृत्ती व परिस्थितीच्या जंजाळात घिरट्या घालणाऱ्या माणसाच्या धडपडीची वेदना मनाला चटका लावते,"डोईवर बोचकं ,त्यावर चाळणीचा जुडगापाटकुळी बांधले इवलेसे तान्हुलं किती किती सामावले तिचे आयुष्य या गोधडी बोचक्यात "विंचवाचे आयुष्य पाठीवर उगवते संपते भटक्या जमातीतील वैदीणीचा हा विदारक जीवन प्रवास व्यापक वैचारिकतेची प्रचिती देणारी रचना आहे ,अमाप जलसंपदा असलेल्या शिवारात पाऊस अनेक रूपात बागडत असतो ही रूपे कवीला प्रतिभा देऊन जातात ,मध्यरात्रीचा पाऊस कवीला सुन्न शिवाराची जाणीव करून देतो , आठवांच्या हिंदोळ्यावर नेऊन कवी भान ढवळून काढतो,"तेव्हा एक एक आठवण सतेज टवटवीत होऊनमाझ्या मनाचा तळ ढवळून काढते ह्या सुनसान मध्यरात्रीस "पुणे येथील यशोदीप पब्लिकेशन ने हा काव्यसंग्रह देखणा वाचनीय स्वरूपात उपलब्ध करून दिला आहे .काही मुद्रण चुका टाळता आल्या असत्या शब्द भेदाने अर्थ बदलतो मायबाप, शेतीवाडी, पर्यावरण, वृक्षवल्ली ,पक्षी प्राणी, जीवनमूल्ये अशा विषयावरच्या 85 कविता या काव्यसंग्रहात समाविष्ट करण्यात आल्या आहेत ,काव्यातील मुक्तछंदातील काही गेय कविता मनाला भुरळ घालणाऱ्या असून अर्थ सौंदर्याचे सौंदर्य हे गुणविशेष म्हणता येईल ,डोंगर कवितेतील गर्द निळ्या दाट धुक्याची पांघूरने, सोन पिवळ्या उन्हातील अंधारून आलेले गच्च निळे आभाळ, दमल्या भागल्या जीवाला गोड विसावा देणारी थंड वाऱ्याची झुळूक या काव्यप्रतिमा मनमोहन आहेत ,निखिल .लंभाते यांचे आशय घन मुखपृष्ठ, भारत हा कृषिप्रधान देश आहे ,85 टक्के शेतकरी ढवळ्या पवळ्याच्या सोबत घाम गाळून अन्न पिकवतो ,अवघ्या जगाच्या पोशिंदाचे औत साकारतानाचे वास्तव चित्रण रेखाटण्यात हे कवी यशस्वी झाले आहेत ,कवी आनंदा डावरे यांच्या पोटातील परिवर्तनाची कळ ओठावरची अंतरिक तळमळ दृष्टी आड करता येणार नाही ,त्यांच्या संघर्षाच्या काही कवितांचा उल्लेख अटळ ठरतो. "बळीराजाचे जगणे ,राजवाडे महापूर ,आयुष्याचे धागे इत्यादी कविता परिस्थितीचा हुंकार व्यक्त करतात ,आयुष्य रूपी वस्त्र सांधतांना भरजरी वस्त्रांची रात्र सजली नाही ही सल कवी येथे व्यक्त करतो ,आजच्या भ्रष्टाचारी राजकीय व्यवस्थेविरुद्धचा रोष "राजवाडे" कवितेत अधोरेखित झाला आहे, भगव्या रंगाचा पापाचा कटोरा, राम नामाचा वांझ जप, आयुष्यातले कुकर्म लपवू शकत नाही ,आज राम मंदिर दानपेटी चोरी ,दागिन्यांचा अपहार पाहता कवी आनंदा डावरे यांची दूरदृष्टी वाखाणण्याजोगी आहे ,वाम मार्गाने उभे राहिलेले राजवाडे दांभिकपणा व कुटनितीची साक्ष देतात ,परिवर्तनासाठी आवश्यक असलेला खंबीर आत्मविश्वास आनंदा डावरे यांच्या मनात आहे असे मत प्राध्यापक नागेश हुलवळे यांनी प्रास्ताविकात व्यक्त केले आहे ते पुढे म्हणतात " धरणाच्या तुंबलेल्या पाण्याच्या संचयनाला सांडावा नसेल तर ते धरणाची भिंत फोडून बाहेर पडू शकते म्हणून माणसाने आपले मन नेहमी रिते करीत राहावे. कवीचे रिक्त होणारे मन म्हणजे या काव्यपंक्ती होय " विषण्ण मनातील आउटलेट आपल्या दमदार साहित्य निर्मितीतून कवी प्राध्यापक आनंदा डावरे यांनी यापुढेही करावा यासाठी शुभकामना !!!!



**- साहेबराव मोरे शेतशिवार**
**काव्यसंग्रह कवी**
**प्राध्यापक आनंदा डावरे**
**प्रकाशक**
**यशोदीप प्रकाशन पुणे_किंमत 160 रुपये**


महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०४ जुलै २०२६

# प्रिय, हा कण गॉड पार्टिकल आहे - बाईची घुसमट व्यथांग वेदनांची कविता




ख्यातनाम कवयित्री आशा अशोक डांगे खरतडे यांचा गोदा प्रकाशने 'प्रिय, हा कण गॉड पार्टिकल आहे' हे शिर्षक म्हणजे बाई जन्माला घातली ही एक स्त्रीत्वाची अमोघ अशी देणगी आहे.म्हणजे आईचं नसते तर काहीच नसते.'आई बाई मायी ताई'हे ईश्वराने दिलेलं एक निस्सीम भक्तीचं बक्षीस आहे.कारण गुणसूत्रांची ही देणगी आहे.तिला फार मोठं बळ दिलं बाळ होण्याचं ते उदरात सांभाळण्याचं.त्याचं काहीही झालं तरी देव म्हणून मी येणारं नाही तूच त्याचं पान्हा भरून भरण पोषण करायचं.तूला एक गॉड पार्टिकल देणं दिली.तो तुझा प्रिय पार्ट आहे.जिथे इश्वर जाऊ शकतं नाही तिथं म्हणून आईची निर्मिती.हे झालं तत्वज्ञान.पण कवयित्री आशा खडतरे डांगे यांनी या व्यवस्थेला सत्यविवेकी प्रश्नकिंत केले आहे.बाईचं जगणं किती खडतर आहे.तिची वेदना मुखर करणारी ही कविता.बाई ते पुरुष असा क्रम असलेली कविता.बाई म्हणजे निर्मिकांचा बाप.या सृष्टीची धरती.प्रस्तूत बाई कविचा अनुबंध हा म्हणजे सदोदित तिच्या भावनेचा कोंडमारा करणारी व्यवस्था.ती नाही पाहु शकतं खिडकीतून,ती फक्त भूलत जाते अन् झुलत झुंजत राहते.तिचं सारं आहे पण फाटकाच्या आत, तिला कुठलेच स्वातंत्र्य नाही.तिच्यासाठी चतुर्थीचा चंद्र विधी म्हणून.ती तिच्या मनाचा डाव माडू शकतं नाही.म्हणून तिच्या मुक्त मनाचा भवताल सीमित होत जातो.तिच्या मुक्त व्यक्त होण्याला बंदिस्त युगाची श्रृंखला आहे.म्हणून ती मनाच्या पानावर अशी व्यक्त होते."आताशा वाटतय/अक्षर मौनाचाप्रदेश/काबीज करतील/आणि/मौनातील धग/उतरवतील कागदावर.../हे मौन चिरंजीव/की माझी कविता"(पृ.२३)ही एक स्त्रीच्या सर्वांगीन अभिव्यक्तीची नांदी आहे.'तिला जगणं आणि लढणं' या कवितेने एक तळमळीची भाषा दिली आहे.व पुरुष अहंकाराचा बुरखा फाडून टाकत बाई मनाच्या कोपऱ्यात जी युगानुयुगांची जळमटं आहे ती निर्विकारपणे बोलणारी ही बिनधास्त कविता आहे.आता रडायचं नाही तर लढायचं आहे.ते सत् विवेकी सृजन चातुर्याने कारण बाई आई म्हणून पिढी जन्माला घालतं असते.हा कोलाहल,ही गुंतागुंत,हे दु:ख गोंजारणारे ढोंग,यावर मात करीत निर्धाराने लढले पाहिजे.असा करारी धारदार निर्धार ही कविता देते.खरं म्हणजे आईच्या उदरातूनचं जे शापित कन्येचंरत्न आले की काय? तीला गोजीर नामाभिधान दिलं ते म्हणजे 'स्त्रीधर्म' या पावित्र्य मार्गावर अनेक पापिष्ट तिच्यावर अन्याय करतात.ती छळ सहन करून त्याला माप करते.इथे तथागतांचे तृष्णेचे मुळ कवयित्री सांगते" हे सारे भोगते,सोसते,जगते/ ती आयुष्यभर/कारण/तिचा एक धर्म आहे/स्त्रीधर्म/तिच्या भोवतालचं जग मात्र/नेहमीच विसरतं स्वत:चा'मानवधर्म'/तिच्याकडे स्त्री म्हणून पाहताना"(पृ.२७)ही अभिव्यक्ती इतकी चिंतन आशय संपन्न सृजन समर्पक आहे की,इथे माणूस म्हणून घेतांना धृणा होते माणूस म्हणून घेण्याची.बाई, झाडं पानं फुलं मुळ्या पाणी ओलं आणि मायेची ओंजळभर सुखाची सावली देणारं झाडं असते.तिथचं विसावता चिमणी पाखरं बाई मात्र उभी असते.मायाळू पान्हा घेऊन.ही अस्सल अस्वस्थ वेदना देऊन जाणारी कविता आहे.बाईचं मुळ आहे म्हणून मनुष्याचं कुळ आहे.म्हणून तिच्या ही हाती क्रौर्याचं त्रिशुळं आहे.ही कविता मानवी मनाच्या खोल तळापर्यंत जाते.म्हणून अनेक विषय आशयाच्या लाटा येतात खडकाला धडका देतात.काहीच लाटा धडकी भरवितात.काही लाटा किनाऱ्या इतिहास घडवित नाही तरी लाटा थांबतचं नाही.हा संघर्ष अटळ आहे म्हणून ही कविता संयत मनोभूमिकेतून आली आहे.'मी मात्र उगवतीचे गीत गात आहे..उजेड भरल्या डोळ्यांनी,हा निर्धार व्यक्त करणारी कविता आहेच तर इथल्या महापौराणीक संदर्भ फार मोठ्या चिंतन समर्पकत्तेतून आले आहे.शाश्वत त्यागचं समीकरण माडणारी यशोधरा कविता प्रश्न करते."सम्यक संबुध्दाकडे/जाणाऱ्या सुत्राची/मांडणी तूच केली आहेस/ सिद्धार्थापासून/तथागतांचा/ प्रवासही तुझ्या करुणेच्या/संपृक्त वाटेवरुनच/झाला आहे ना यशोधरे!"(पृ.३३) सनातन दु:खाची सल किती भंयकर आहे तर तिची आठवण येते हे सारं मन उद्विग्न करणार आहे.काही कविता 'हा असा अवेळी, आठवणीचा गलका, तू चकवा तर नाहीस ना?,या साऱ्या मुळांच्या टोकाशी असलेली खोल खोल ओल कवयित्रीने शोधली आहे.मनाच्या पावित्र्यासाठी.मी मात्र केवळ भूक क्षमवणारी.इथे शील-अश्लील,पाप पुण्य, नैतिक-अनैतिक, चारित्र्य-बिरीत्र्य या संकल्पना फक्त भूकेवर मात करण्यासाठी.तिच्यावर होणारा अत्याचार, फक्त ती सहन करत असते.या गर्दीतही गरळ ओकणारे असतात.तिच्या गॉड पार्टिकल भागावर.जनातले सज्जन हे फक्त मनाने व्यवस्थेवर बोलू शकत नाही.ही कविता भाष्य करते.रामायण महाभारता सुरू होते तिच्या विषयी म्हणून 'अग्निपरीक्षा'या कवितेचा मर्मग्राही अनुबंध म्हणजे इथल्या वासनांधाचा कळस कवयित्रीने दाखवला आहे.देवेंद्र-अहिल्या,दशरथ कौशल्या ते वर्तमानात चारित्र्यावर संशय घेऊन पत्नीचा खून.शील ही पावित्र्य भावना म्हणून "अरे..!/श्वापंदाचे भक्ष्य/होण्याकरिता जंगलात सोडून देणं/आणि/माणसातील श्वापदांचं/भष्य होणं/वेगळं असतं का रे राघवा?"(पृ.४६) हा सम्यक दृष्टीचा प्रश्न म्हणजे या पुरुषी मानसिकतेला सुरुंग लावून ठिणगी टाकणे होय.'देह जाणिवांचे पसारे,कवच कुंडलं,शहर,एक कविता विझून जाते, उत्खनन,सखे, शहरभर विखूरलेले शब्द, मेणाचं घर,या कवितेचा आत्मा म्हणजे डोमकावळा होऊन पुरुषी मनोवृत्ती तिरकी नजर.तर कवयित्री म्हणते 'सीते चुकलं तर तुझंच आहे ना'इथं रोज या मातीत मरतात,या डोहात जीव विहीरीत जीव देतात.आजच्या वास्तवात ही तिचीच अग्नी परीक्षा आहे "सीते, चुकलं तर तुझंच आहे ना../पातिव्रत्याचा हा आदर्श/तू घालून दिलास ग"(पृ.६३) हजारो वर्षे केवळ बाई-माणूस म्हणून ही अवहेलना थांबली नाही.या कवितून 'युगांतरची बीज' इथल्या मनोविकृतीचे जाच सहन करायचे नाही.इथल्या शहरानेही भंयकराची साथ आणली आहे याची सखेद भेदक नोंद या कवितेने घेतली आहे.'मी आणि तू'मुळात ही आदी अनंत युगाचा इव्ह आणि ऍडम तर नाही ना.मग ही जीवघेणी घुसमट केवळ स्त्रियांच्या वाट्याला आली आहे.याची प्रखरतेने जाणिव ही कविता करून देते.'बुध्द जिवंत आहे 'या सृजन सृष्टीची महती नीळे आकाश, अथांग सागर,हिरवे झाडांचे रंग,लाल रक्तरंग, म्हणजे स्त्रीत्वाची अमोघ मातृत्वाची आस घेऊन जगणारी तू फक्त शांती देणारी म्हणून बाईत बुद्ध जागता आहे ही अतिशय गंभीर तरल भाव कविता.या साठी श्रृंगार मनतृप्ती म्हणून हा काव्यमय हळवा कोपरा कवयित्री व्यक्त करते.मी निर्मिक निर्माण निर्मितीची जननी आहे.मी आहे म्हणून तू आहेस.तुझ्या भरल्या मनाच्या खोल तळापर्यंत मीच पोहचते तेंव्हा तुझे माणूस असल्याचे अस्तित्व तुला मिळते.कारण हे गॉड गिफ्ट आहे.जसे"प्रिय,हा कण/अनादिकाळापासून/गॉड पार्टिकल आहे/हे कसं विसरतोस तू...!"(पृ.७०) हीकवितेची 'समीधा'कायमचं जळते इथल्या अग्नीकुंडात.ही माझ्यातील कविता वेदनेला जन्म देते.तीचं जळणं,खूपनं,कुढणं,ती त्याच्यासाठी सारे सुख देते पण ती सामान्य चं राहते काय तर ती स्त्री आहे म्हणून.हे अंतर विरघळून गेले पाहिजे.तो सोबत राहतो पण दूर दूरचं.ती अभिनय करत लढत राहते.ती या कवितेचा स्वर म्हणजे एक सखेद वेदना आहे.कविता श्वास होऊन जाणे म्हणजे जगण्याची उर्मी मिळणे.ही सारी दु:खाची फुलं अंगावर झेलून ती सावली होते.ती अनेक दु:ख दडपून ठेवते असे नाही तर त्याची सल अलवार करतं ती व्यक्त होते.म्हणून 'माझ्या आसवांचे संदर्भ जेव्हा काटेरी होऊन येतात.या कवितेने एक आदिम गीत ठेव माझ्या ओठांवर तुझं.किंवा निमुट समर्पित होताना,ही आदिम भूक,या पाषाणाच्या गर्भालाही आणि शेवट काय तो नसला तरी तो असतो पुरुषचं..! ही कविता अतिशय तात्विक विचारांची बांधिलकी घेऊन आलेली आहे.ख्यातनाम जेष्ठ समीक्षक डॉ ऋषिकेश कांबळे सर पाठराखण करतात.(ब्लर्ब)"स्त्रीमनाचं मनोविश्व आणि भावविश्व चितारतांना त्यांच्या कवितेत पुरूष हा खलनायक ठरतं नाही.हे त्यांच्या कवितेच बलस्थान आहे.पुरूष हा मनुष्य आहे.म्हणून त्याच्या भावात्मकतेकडं मानवी प्रवृत्ती या दृष्टीनं पाहावं असं त्यांच्या कवितेचं प्रतिपाद्य आहे.अशा प्रकारचा आविष्कार मराठी कवितेत अभावानं आला आहे.स्त्रीवादी कवितेतील असमज भावना त्यांच्या कवितेत जाणवत नाही.याचे समाधान व्यक्त केले पाहिजे"(मलपृष्ठ)हे चिंतन आशय संपन्न सृजन भावनेचा ओलावा टिकून राहवा.तरख्यातनाम कवयित्री डॉ कविता मुरुमकर प्रस्तावनेत लिहितात"आपल्या स्त्रीत्वाचा शोध घेणे व त्यातून भोवतालच्या वर्तमानाचा वेध घेत जीवनाची दाहकता समजावून घेणे कवयित्रीला महत्त्वाची वाटते.जीवनाच्या वर्तमानात भोवतालच्या जगण्याचा कोलहाल अनुभवताना स्त्रीत्वाच्या आत्मशोधातून आलेली अनुभूती आशा डांगे यांनी या 'प्रिय,हा कण गॉड पार्टिकल आहे '.. त्यांच्या दु:खभोगाविषयी, घुसमटीविषयी आस्था आणि अपार करुणा बाळगणारी ही कविता आहे कवयित्रीच्या चिंतनाला व्यापक असे सांस्कृतिक व सामाजिक संदर्भ आहेत.पारंपरिक धारणांची मूल्यात्मक चिकित्सा करणारी ही कविता आहे."(पृ.१५,प्रस्तावना) आपल्या सुख दु:खात साथ देणारे पतीराजांना हा कवितासंग्रह अर्पण केला आहे.आणि कविते,मी तुझ्या गावाच्या वेशीवर पुन्हा माथा टेकवते!मनोज्ञ मनोगत तितकेच तरल.संतुक गोळेगावकर यांचे अशांत आशय संपन्न सृजन समर्पक मुखपृष्ठ. डॉ धोंडोपंत मानवतकर यांची रेखाटने अतिशय अप्रतिम.

**पुस्तक:-प्रिय,हा कण गॉड पार्टिकल आहेकवयित्री:-आशा अशोक डांगे प्रकाशक:- डॉ.दादा गोरे, गोदा प्रकाशन संभाजीनगर प्रथमावृती:- मार्च २०२५मुखपृष्ठ:-संतुक गोळेगावकर रेखाचित्र:- डॉ.धोंडोपंत मानवतकर किंमत:-२००/रूपये**



**पुस्तक परिक्षण:- डॉ प्रभाकर शेळके, जालना**